**ठळक बातम्या**

- वीज कर्मचारी संघटनांनी पुकारलेला ७२ तासांचा संप मागे
- नागपूर ओबीसी समाजाचा मोर्चा, तेलगंणा सरकारप्रमाणे ४२ टक्के आरक्षण देण्याची मागणी
- पात्र कुणबी मराठा नागरिकांनाच ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या भूमिकेचा सरकारकडून पुनरुच्चार
- भारत - वेस्ट इंडिज दरम्यान दुसऱ्या कसोटी सामन्यात पहिल्या दिवसअखेर भारताच्या ३१८ धावा, यशस्वी जयस्वाल १७३ धावांवर नाबाद

**आणि**

- नैऋत्य मौसमी पावसाचा राज्यातून माघारीचा प्रवास आजपासून सुरू

**<><><><>**

वीज कर्मचारी संघटनांनी आपला संप मागे घेतला आहे. कालपासून सुरू झालेल्या या ७२ तासांच्या संपाविरोधात वीज महावितरण कंपनीने मुंबई औद्योगिक न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर आज सुनावणी झाली. या सुनावणी दरम्यान संयुक्त कृती समितीने संपातून २४ तासानंतर माघार घेत असल्याचं जाहीर केलं. महावितरणमधील २९ पैकी ७ संघटनांच्या संयुक्त कृती समितीने आपल्या विविध मागण्यांसाठी या ७२ तासांच्या संपाची नोटीस दिली होती. महावितरण, महापारेषण आणि महानिर्मितीतले जवळपास ३७ टक्के कर्मचारी या संपात सहभागी झाले होते.

**<><><><>**

तेलंगणा सरकारप्रमाणे राज्यातही ओबीसींना ४२ टक्के आरक्षण द्यावं अशी मागणी नागपूरात निघालेल्या ओबीसी मोर्चात करण्यात आली. राज्य सरकारनं ओबीसींकडे दुर्लक्ष केलं तर मुंबई, पुणे, ठाणे यासारख्या ठिकाणीही आंदोलन करण्याचा इशारा ओबीसी नेते विजय वड्डेट्टीवार यांनी दिला आहे. नागपूरात ओबीसी महामोर्चानंतर आयोजित सभेत ते बोलत होते. राज्य सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयामुळे राज्यातील

ओबीसी समाज अस्वस्थ झाला असल्यानं हा शासन निर्णय सरकारने रद्द करावा या मागणीचा पुनरुच्चार त्यांनी केला. शासन निर्णयानंतर मराठवाड्यात दररोज हजारो प्रमाणपत्रांचे वाटप सुरू आहे. यामुळे राज्यात ओबीसी तरुणांचे आत्महत्यांचे सत्र सुरू झाल्याचा दावा त्यांनी केला.

विदर्भातल्या विविध जिल्ह्यातल्या सकल ओबीसी संघटनांनी दुपारी निघालेल्या या मोर्चात सहभाग घेतला. त्यात विविध पक्षांच्या लोकप्रतिनिधींसह मोठ्या संख्येनं नागरिक सहभागी झाले होते.

**<><><><>**

ओबीसी आरक्षणाला किंचितही धक्का लागणार नाही, सरकार ओबीसींच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी कटीबद्ध आहे, असं आश्वासन ओबीसीविषयक मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलं आहे. जे खऱ्या अर्थाने पात्र कुणबी मराठा आहेत, केवळ त्यांनाच ओबीसी प्रमाणपत्रं मिळतील, अशी ग्वाही त्यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली.

पूरस्थितीमुळं झालेल्या नुकसानीचे पंचनामे अजून पूर्ण झालेले नाहीत. गरज पडली तर आणखी तालुके आणि गावांचा यात समावेश केला जाईल. जाहीरनाम्यात सांगितल्याप्रमाणे गरजू शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी करु असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><>**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीत आघाडीबाबतचा निर्णय स्थानिक पातळीवर घेतला जाईल, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज सांगितलं. ते मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. या निवडणुकांसाठी काँग्रेसची तयारी सुरु असून राज्यातल्या सर्व जिल्ह्यांच्या आढावा बैठका झाल्या आहेत. इच्छुक उमेदवारांचे अर्जही मागवले आहेत, असं त्यांनी सांगितलं.

बंद गिरण्यांच्या जमिनीवर ३३-३३-३३ सूत्रातल्या सार्वजनिक उपक्रमाचे ३३ टक्के भूखंड उद्योगपतींच्या घशात घातले जात आहेत, हा प्रकार थांबवून या भूखंडावर 'परवडणारी घरं' योजना राबवावी, यासाठी काँग्रेसनं २५ विविध संघटनांसोबत एक अभियान हाती घेतलं आहे, अशी माहिती सपकाळ यांनी दिली.

**<><><><>**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी विविध ठिकाणी पंचायत समिती सभापती पदाची सोडत काढण्यात आली.

**गडचिरोली** आणि **सोलापूर** जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांच्या सभापतीपदाची आरक्षण सोडत आज काढण्यात आली. गडचिरोलीतल्या एकूण १२ पंचायत समित्यांच्या सभापतीपदापैकी ७ समित्या अनुसूचित क्षेत्रात असल्यामुळे त्यांचं सभापतीपद अनुसुचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात आलं आहे. सोलापूरमध्ये ११ पंचायत समित्या आहेत. त्यापैकी ६ पंचायत समित्यांचं सभापतीपद महिलांसाठी राखीव झालं आहे.

**सांगली** आणि **नांदेड** जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांच्या आरक्षणाची सोडतही आज काढण्यात आली.

**<><><><>**

नवी दिल्लीत अरुण जेटली मैदानावर आज सुरु झालेल्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात दिवसअखेर भारतानं २ बाद ३१८ धावा केल्या.

भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. सलामीच्या जोडीतला के एल राहुल ३८ धावा करुन बाद झाला. मात्र यशस्वी जयस्वालनं दीडशतकी दमदार खेळी केली. दुसऱ्या गड्यासाठी त्यानं साई सुदर्शनसोबत १९३ धावांची भागीदारी केली. साई सुदर्शन ८७ धावांवर बाद झाला. आजचा खेळ थांबला तेव्हा यशस्वी जयस्वाल १७३, तर कर्णधार शुभमन गिल २० धावांवर खेळत होता.

**<><><><>**

आगामी रणजी करंडक हंगामासाठी मुंबई क्रिकेट असोशिएशनं मुंबई संघाच्या कर्णधारपदी अष्टपैलू शार्दूल ठाकूरची नियुक्ती केली आहे. संघटनेनं मुंबईचा सोळा खेळाडूंचा संघ आज जाहीर केला. त्यात सर्फराज खान आणि अजिंक्य राणे यांचा समावेश आहे.

या रणजी करंडक स्पर्धेत मुंबईचा पहिला सामना जम्मू काश्मीरशी होणार आहे. श्रीनगर इथं येत्या बुधवारी हा सामना सुरु होईल.

**<><><><>**

द्राक्ष बागायतदारांच्या समस्यांची सरकारला जाण असून बागायतदार संघटनांनी मांडलेल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्याचं आश्वासन कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

यांनी आज दिलं. राज्य द्राक्ष बागायतदार संघानं सोलापूरमध्ये आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते.

राज्यातल्या चार कृषी विद्यापीठात प्रत्येकी तीन याप्रमाणे एकूण १२ ‘सेंटर फॉर इनोव्हेशन अँड डेव्हलपमेंट इन स्मार्ट अॅग्रीकल्चर- **सिडसा** सुरू करायला मंजुरी दिल्याचं भरणे यांनी सांगितलं.

<><><>

कांद्यांच्या दरात सातत्यानं घसरण होत असल्यानं संतप्त शेतकऱ्यांनी आज स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली निफाड तालुक्यातील विंचूर इथं रास्ता रोको आंदोलन केलं. या आंदोलनामुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी पोहोचून आंदोलकांशी चर्चा केली. पोलिस आणि प्रशासनाच्या मध्यस्थीनं आंदोलन मागं घेण्यात आलं.

<><><>

रासायनिक खतांची विक्री पॉईंट ऑफ सेल मशीनद्वारे न केल्याने रत्नागिरी जिल्ह्यातल्या सहा खतविक्रेत्यांचे विक्री परवाने निलंबित करण्यात आले. रासायनिक खतांची विक्री पॉस मशीनद्वारे करणं बंधनकारक असूनही विक्रेते नियमांचं पालन करत नसल्याचं तपासणीत आढळून आल्यानं ही कारवाई करण्यात आली.

<><><>

ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयानं मुंबईत ९ ठिकाणी छापे टाकून अंमली पदार्थांच्या तस्करीचं जाळं उद्ध्वस्त केलं आहे. या कारवाईत ४२ लाख रुपयांची बेहिशेबी रोकड जप्त करण्यात आली आहे. त्याशिवाय आलिशान गाड्या आणि १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या कंपन्यांवर जप्तीची कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये ही तस्करी एका जोडप्याने केल्याचं उघड झालं आहे.

<><><>

नाशिक महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना २३ हजार ५०० रूपयांचं सानुग्रह अनुदान जाहीर झालं. शासनाकडून दिल्या जाणाऱ्या अनुदानातून मानधन आणि वेतन घेणारे, सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधी मनपामध्ये कार्यरत असलेल्या

कर्मचाऱ्यांना १४ हजार १०० रूपये इतके सानुग्रह अनुदान देणार असल्याची माहिती महापालिकेच्या आयुक्त मनीषा खत्री यांनी दिली.

<><><><>

रत्नागिरी जिल्ह्यात 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' या अभियानांतर्गत जिल्हा प्रशासनाने ३ हजार ८३९ आरोग्य तपासणी शिबिरं आयोजित केली. त्यात २ लाखांहून अधिक नागरिकांची आरोग्य तपासणी केल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी दिली आहे. यावेळी ३९ हजारांहून अधिक नागरिकांना आयुष्मान भारत आणि वय-वंदन कार्डचं वितरण करण्यात आलं.

<><><><>

मुंबई दूरदर्शन केंद्राच्या वृत्त विभागात ९ पदांसाठी पूर्णवेळ कंत्राटी तत्वावर पदभरती सुरू आहे. पात्र उमेदवारांनी १५ दिवसांत avedan.prasarbharati.org वर ऑनलाइन अर्ज करता येईल.

<><><><>

२०२५चा शांततेचा नोबेल पुरस्कार व्हेनेझुएलाच्या मारिया कोरीना मच्याडो यांना जाहीर झाला आहे. व्हेनेझुएलामध्ये नागरिकांच्या लोकशाही हक्कांचं रक्षण आणि हुकुमशाहीपासून लोकशाहीकडे देशाची वाटचाल शांततेत व्हावी, यासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल हा पुरस्कार दिल्याची घोषणा नॉर्वेच्या नोबेल समितीनं केली.

<><><><>

नैऋत्य मौसमी पावसाचा राज्यातून परतीचा प्रवास आजपासून सुरू झाला.  राज्यात मान्सूनच्या परतीची सीमारेषा अलिबाग, अहिल्यानगर, आणि अकोला तिथून जात आहे. पुढच्या तीन ते चार दिवसात राज्याच्या इतर भागातूनही मान्सूनच्या परतीसाठी परिस्थिती अनुकूल असल्याची माहिती हवामान विभागानं दिली आहे.

येत्या दोन दिवसात कोकण, आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात मराठवाडा आणि विदर्भात हवामान कोरडं राहील.

//<><><><>//